# दहिसर पश्चिम कांदरपाडा कोविड केअर केंद्राचे लोकार्पण

लोकमत न्यूज नेटवर्क

**मुंबई :** पश्चिम उपनगरातील शेवटचे टोक म्हणजे दहिसर, तर पालिकेच्या वॉर्डची सुरुवात दहिसर प्रभाग क्रमांक १ पासून होते. येथे कोविड केंद्र सुरु झाल्याने पश्चिम उपनगरातील रुग्णांना सोयीचे ठरणार आहे. आज मुख्यमंत्री व शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्या वाढदिवसादिनी येथे उभारण्यात आलेल्या कोविड सेंटरचे लोकार्पण करण्यात आले.



याप्रसंगी म्हाडा सभापती विनोद घोसाळकर, विभागप्रमुख आमदार विलास पोतनीस, महिला विभाग संघटक सुजाता शिंगाडे व अन्य उपस्थित होते.

शिवसेना उपनेते, म्हाडा सभापती बिनोद घोसाळकर यांनी पश्चिम उपनगरातील रुग्णांची वाढत जाणारी संख्या लक्षात घेऊन या ठिकाणी कोविड केंद्र सुरु करण्याची मुख्यमंत्री उद्धव ठाकरे यांच्याकडे मागणी केली होती. त्यानुसार या ठिकाणी दहिसर (पश्चिम) कांदरपाडा येथे हे अद्ययावत केंद्र सुरु करण्यात आले आहे. हे केंद्र मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशनच्या पुढाकाराने उभारण्यात आले आहे. यावेळी तेथे असलेल्या उपकरणांची पाहणी करुन घोसाळकर यांनी समाधान व्यक्त केले. दरम्यान, अधिकाधिक लोकांनी या केंद्राचा लाभ घ्यावा, असे घोसाळकर यांनी यावेळी सांगितले.

या केंद्राच्या लोकार्पण प्रसंगी म्हाडा सभापती विनोद घोसाळकर, विभागप्रमुख आमदार विलास पोतनीस, महिला विभाग संघटक सुजाता शिंगाडे, मुंबई बँक संचालक व माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर, उपविभागप्रमुख विनायक सामंत आदी मान्यवर उपस्थित होते.

या कोविड केंद्रात १०८ आयसीयू बेडची सुविधा उपलब्ध करण्यात आली आहे. या ठिकाणी डायलिसिस सुविधा उपलब्ध असल्याने रुग्णांवर एकाच ठिकाणी सर्व उपचार होणार आहेत. हे केंद्र सुरु झाल्याने स्थानिक शिवसेना नगरसेविका तेजस्वी घोसाळकर व माजी नगरसेवक अभिषेक घोसाळकर तसेच येथील नागरिकांकडून मुख्यमंत्री आणि प्रशासनाचे आभार व्यक्त करण्यात आले.